## यादी क्रमांक ३

## बिल्डर्सकडून तयार नवीन सदनिका / घर खरेदी करावयाचे असल्यास घरबांधणी अग्रिम मंजूरीसाठी लागणारी आवश्यक ती माहिती व कागदपत्रे

**( अग्रिम मंजूरीची मर्यादा - घराची प्रत्यक्ष किंमत किंवा मूळ वेतनाच्या ५० पट किंवा रु. ७,५०,०००/- यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम एकाच हप्त्यात मंजूर करण्यात येईल.)**

१) नांव :- पद :-

२) कार्यालयाचे नांव :-

३) सध्याचे मूळ वेतन :-

४) शासकीय सेवेत रुजू झाल्याचा दिनांक :-

५) सेवानिवृत्तीचा दिनांक :-

६) अग्रिमाची मागणी किती रुपयाची आहे. :-

७) अग्रिम मंजूर झाल्यास अग्रिमाच्या परतफेडीची आपली दरमहा आपली क्षमता किती आहे ते नमूद करावे. (किमान व कमाल रक्कम नमूद न करता एकच रक्कम नमूद करावी.)

८) कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचे पदनाम.

९) कार्यालयातील देयके ज्या कोषागार / उपकोषागार कार्यालयात सादर करुन परित केले जातात त्या कार्यालयाचा पत्ता.

१०) कार्यालयातील दूरध्वनी क्रमांक

११) ज्या जागेवर नवीन फ्लॅट बांधले जाणार आहेत, त्या जमिनीवर त्या बिल्डर्सचा निर्विवाद हक्क (Clear Title) असला पाहिजे. (शासकीय वकीलांनी दिलेले विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करावे.)

१२) ज्या जमीनीवर नवीन फ्लॅट बांधले जाणार आहे, ती जमीन ज्या महसूल अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली येत असेल त्या महसूल अधिकाऱ्यांनी बिल्डर्सचा जमिनीवर निर्विवाद हक्क असल्या बाबतचे दिलेले प्रमाणपत्र.

१३) Maharashtra Ownership Flats Regulation of the Promotion of Construction Sale, Management and Transfer Act १९६३ अंतर्गत विहित केलेल्या " आदर्श करारानुसार " (Model Agreement) नुसार राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित बिल्डर्स यांच्यामध्ये झालेल्या लेखी कराराची सांक्षांकित प्रत सदर करार सक्षम प्राधिकाऱ्यांकडे नोदणीकृत करण्यात आला असला पाहिजे.

१४) नव्या घराच्या संदर्भात मुल्यांकन किंमत ग्राह्य धरण्यासाठी नव्या घराची किंमत दुय्यम निबंधक यांनी मान्य करुन नोंदणी फी आकारलेली असल्याने नव्या घराच्या संदर्भात नोंदणी केलेल्या दस्तामध्ये धरलेली किंमत ग्राह्य धरण्यात येईल. तथापि संबंधितांनी दुय्यम निबंधकाकडील नोंदणी फी भरल्याबाबतचे प्रमाणपत्र / पध्दती सादर करणे आवश्यक आहे.

कृ.मा.प.

१५) घेणार असलेल्या ठिकाणी माझे स्वतःचे, पत्नीचे अथवा माझ्या अज्ञान (Minor Children) मुलाचे नांवे कोणतेही घर किंवा जागा नाही याबाबत शपथपत्र.

१६) आपण यापूर्वी घरबांणीच्या प्रयोजनार्थ शासकीय / निमशासकीय / वित्तीय संस्था इत्यादी कार्यालयातून कर्ज घेतले आहे का ? असल्यास सविस्तर माहिती देण्यात यावी.

१७) आपली पत्नी / पती शासकीय / निमशासकीय कार्यालयात नोकरीला आहे काय ? असल्यास त्यांनी शासकीय / निमशासकीय कार्यालयातून घरबांधणी अग्रिमांतर्गत यापूर्वी कर्ज घेतलेले आहे काय ? कर्ज घेतलेले असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

१८) खाली नमूद केलेली कागदपत्रे अग्रिमाची रक्कम आपणास प्राप्त झाल्यापासून एक महिन्याचे आत मंत्रालयास सादर करणे आवश्यक असल्याने ते एका महिन्याच्या कालावधीत सादर करण्याबाबतचे हमीपत्र.

**कर्मचाऱ्याची स्वाक्षरी**

असे प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त बाबींपैकी कार्यालयाशी संबंधित असलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखावरुन तपासण्यात आली असून नमूद केलेली माहिती बरोबर आहे.

**कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी**
**व पदनाम**

---

**टीप :**

**१)** अनुज्ञेयतेनुसार मंजूर होणारी रक्कम पहिल्या हप्त्यात ३०%, दुसऱ्या हप्त्यात ४०%, तिसऱ्या हप्त्यात ३०% याप्रमाणे मुक्त करण्यात येईल.

**२) अग्रिम मंजुरीनंतर जागा विक्रेत्यानी घर / फ्लॅट विक्रीचे नाकारले किंवा काही कारणास्तव घराचा व्यवहार न झाल्यास अग्रिमाची रक्कम दुसरे घर / फ्लॅट घेण्यासाठी अनुज्ञेय ठरणार नाही तर अग्रिमाची रक्कम शासनास दंडनीय व्याजासह एकरकमी परत करावी लागेल याची कृपया नोंद घ्यावी.**

**३) पती व पत्नी दोघेही शासकीय सेवेत असल्यास दोहोपैकी फक्त एकासच घरबांधणी अग्रिम अनुज्ञेय ठरते.**

---

**अग्रीम मंजूरीची रक्कम कोषागारातून काढून आपणस प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत खालील काग्रदपत्रे सादर करावी लागतील.**

१) आपल्या कार्यालयाने मंजूर रक्कम उपलब्ध करुन दिल्याचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक.

२) ज्या कारणासाठी अग्रिम मंजूर केले त्याच कारणासाठी खर्च केल्याची मुद्रांकित पावत्या. (रु. १/- च्या स्टँप रेव्हेन्यू स्टँम्पवर बिल्डर्सच्या स्वाक्षरीसह)

३) घराचे / फ्लॅटचे गहाणखत (निबंधक कार्यालयात नोंदणीकृत केलेले)

४) वैयक्तिक बंधपत्र नमूना जी-३

५) दोन स्थायी कर्मचाऱ्यांकडून हमीपत्र जी-४

६) चांगले बांधकाम जोत्यापर्यंत / छतापर्यंत झाल्याचे प्रमाणपत्र.

७) अग्रिम मंजूरीच्या शेवटच्या हप्त्याची रक्कम प्राप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत घर / फ्लॅट पूर्ण बांधून झाल्याचे ग्रामपंचायत / नगरपालिका / महानगरपालिकेचे प्रमाणपत्र.

८) घर / फ्लॅटचा विमा काढल्याची पावती.